# मुल्हेर ते साल्हेर

## सोबत हरगड, मोरागड आणि सालोटा ट्रेकिंगिरी

- पंकज घारे



ट्रेकिंगिरी
मुल्हेर ते साल्हेर

प्रकाशनाचा दिवस:
शिवजयंती, १९ फेब्रुवारी २०१४

लेखक: पंकज घारे
mr_ghare@yahoo.co.in


संपर्क : सी- ३११, वास्तु-वृंदावन,
प्लॉट नं. ३०,सेक्टर-८ ए,
ऐरोली, नवी मुंबई- ४०० ७०८
भ्रमणध्वनी क्र. : ९८१९ ६६ ३६ ३०

मुद्रित शोधण : श्रीमती पूर्णिमा जाधव
ट्रेकिंगिरी सुलेखन: श्री. सुनिल वागळे

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान
९८६९६७४८२०

वेबसाईट : www.esahity.com
ई-मेल : esahity@gmail.com

# समर्पित




प्रकाशनाचा दिवस:
शिवजयंती, १९ फेब्रुवारी २०१४

म्हणे क्रिकेटमुळे दोन देश जोडले जातात. इथे तर पाण्यासाठी कालव्याने दोन जिल्हे, दोन राज्यं जोडताना मारामारी! आकाश-जमीन कधी सूर्यकिरणांनी तर कधी पावसाने जोडलेले. गावे, शहरे रस्त्याने- रेल्वेने जोडलेली. त्यासाठी कधी समुद्रात पूल बांधले तर कधी बोगदे बनवले. हिमालय, भारत आणि चीनला वेगळे करतो. सह्याद्रीची उत्तर-दक्षिण पर्वतरांग, गुजरात आणि महाराष्ट्राला वेगळे करते; तशी ती कोकण आणि पठाराला जोडतेही. पण दोन मनं कधी आणि कशी जुळणार ?

तर निमित्त आहे फक्त गड-किल्ल्याचं. गुजरातच्या डांग आणि नाशिकमधील बागलाण या प्रांतांच्या सीमेवर सेलबारी आणि डोलबारी रांगेवर अनेक किल्ले आहेत. त्यासाठी शक्य तितक्या सकाळी नाशिक गाठून तिथून ताहराबादला जाताना प्रत्यक्ष घडलेल्या इतिहासापैकी इंटरनेटवरून सोबत घेतलेला इतिहास वाचू लागलो. तो असा:

मुल्हेरचा किल्ला प्राचीन आहे. पूर्वी किल्ल्यातच गाव वसलेले होते. मात्र कालांतराने गाव खाली उतरले आणि पायथ्यापासून सुमारे २ किमी अंतरावर वसले. *(स्थानिक लोक हे दुर्ग संवर्धनासाठी महत्वाचे आहेतच. योग्य सुविधा मिळाल्या नाहीत तर कदाचित ते गडापासून आणखी दूर जातील.)* या भागात मयूरध्वज नावाचा राजा होऊन गेला आणि गावाला मयूरपूर नाव पडले. तर किल्ल्याला मयूरगड हे नाव पडले. औरंगजेबने किल्ला जिंकला तेव्हा याचे नाव औरंगगड असे ठेवण्यात आले. मुल्हेरचा किल्ला बागुल राजांनी बांधला.

इ.स. १३०८ ते १६१९ पर्यंत बागुलांनी येथे राज्य केले. या घराण्याच्या नावावरूनच परिसराला बागुलगड व त्याचा अपभ्रंश बागलाण हे नाव पडले. *(एखाद्या जागेचं नाव काय असावं आणि नाव पसरावं हे तेव्हाही अस्तित्वासाठी महत्वाचं होतं. राजेशाही असल्याने तेव्हा नामांतरणाचा वाद नव्हता.)* बागूल राजे हे *(सुद्धा)* मुळचे कनोजचे. या बागुल घराण्याच्या काळातच जगप्रसिद्ध मुल्हेरी मूठ बनवण्यात आली. या घराण्यात एकूण ११ राजे झाले. या राजांना बहिर्जी ही पदवी होती. विजयनगरमध्ये हिंदू सत्ता प्रस्थापित होण्यापूर्वी कितीतरी अगोदर बागलाणमध्ये हिंदू सत्ता प्रस्थापित होती.

अकबराने जेंव्हा खानदेशचे राज्य जिंकले तेंव्हा प्रतापशहा बहिर्जी बागलाणचा राजा होता. त्याने मोगलांचे सार्वभौमत्व पत्करले. पुढे शाहजहानशी या राजाने मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले. जुलै १६३६ला औरंगजेबची दक्षिणेचा राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. इ.स. १६३८ मध्ये वैभवशाली हिंदूंचे राज्य संपुष्टात येऊन तेथे मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. मुल्हेर ही बागलाणची परंपरागत राजधानी. किल्ल्यावर महंमद ताहीर याची नेमणूक प्रथम किल्लेदार म्हणून झाली. या ताहीरने मुल्हेरजवळ ताहीर नावाचे गाव वसवले व त्याचे कालांतराने 'ताहीराबाद' असे नामकरण झाले. इ.स. १६६२ मध्ये मुल्हेर किल्ल्यामधील सैनिकांनी अपुऱ्या पगारासाठी बंड केले.

दुसऱ्या सुरत लुटीनंतर शिवाजी महाराजांनी बागलाण मोहीम उघडली. यामध्ये त्यांनी साल्हेर, मुल्हेर व इतर किल्ले स्वराज्यात सामील करून घेतले. मराठ्यांनी १६७१ मध्ये प्रथम मुल्हेरवर हल्ला केला पण किल्लेदाराने तो थोपवून धरला. मग मराठ्यांनी त्याचा नाद सोडला. मात्र साल्हेरच्या लढाईनंतर फेब्रुवारी १६७२ मध्ये मराठ्यांनी मुल्हेरगड काबीज केला. त्यानंतर पुन्हा किल्ला मोगलांच्या हातात पडला.१७५२ च्या भालकीच्या तहानुसार मुल्हेरसकट खानदेशमधील सर्व प्रदेश मराठ्यांच्या हाती आला. यानंतर त्रिंबक गोविंद मुल्हेरचा किल्लेदार झाला. पुढे १७६५ मध्ये किल्ल्यावर गुप्तधन मिळाल्याच्या नोंदी पेशवे दफ्तरात आहेत. १५ जुलै १८१८ मध्ये हा ब्रिटीशांच्या तावडीत सापडला.





बस गडाच्या दिशेने जाताना मन इतिहासाला वळसा घालून आले. सरकारी बस वापरल्याने आणि वापर वेगवेगळ्या कारणाने वाढल्याने गावांना बराच फायदा होऊ शकतो. होतोच. ताहराबादला सकाळचा नाश्ता झाला आणि शहरातला पैसा गावात आला. ताहराबादपासून वाहनातून अठरा जणांना कोंबून आम्हा नऊ जणांना या नवलाईसकट मुल्हेर गावापर्यंत आणून सोडलं. त्या वाहनचालकाचा व्यवसाय झाला.

उतरताच समोर मुल्हेर, डावीकडे मोरागड आणि उजवीकडे हरगड अशी तीन आव्हानं मन खूष करतात. विश्रांतीसाठी सुंदर पार असलेल्या आंब्याच्या झाडासमोरील रस्त्याने पायी प्रवास सुरू झाला. सुरुवातीची वाट अगदीच स्पष्ट आहे. हरगडावर जाण्यासाठी आधी खिंडीत जावे लागते हे वाचून होतो पण तरीही त्या दिशेने जाणारा रस्ता काही दिसत नव्हता. विश्रांतीसाठी वाटेत सिमेंटच्या अनेक झोपड्या टेकड्यांवर दिसत होत्या. तिथे न थांबता वळणदार रस्त्यावरून चालतच होतो.



वाटेत समोर बुरुजावर गणपतीचे व हनुमानाचे शिल्प (ते शेंदूर फासलेले असल्यामुळे) दिसते. बुरूजासमोर मागे डावीकडे पहिला कमानी नसलेला दगडी दरवाजा दिसतो आणि काही वेळाने दुसरे भग्न प्रवेशद्वार. थोडा चढ चढल्यानंतर कमानी शाबूत असलेल्या दरवाजामागे सुंदर नक्षीकाम आहे. हा पार केल्यानंतर आपोआपच उजवीकडे मोठ्या गणेश तलावावर नजर जाते. तलाव हिरवागार (?) आहे.







तलावाच्या अलीकडे एका पडक्या वास्तूची खिडकी शाबूत आहे. तलावापलीकडे आत-बाहेर अप्रतिम नक्षीकाम असलेले दगडी बांधकामाचे मंदीर आहे. पाणी स्वच्छ असते तर याचे प्रतिबिंबही सुंदर दिसले असते. मंदिराशेजारील दगडांवरून चालताना आपण मंदिरापासून तुटलेल्या भागांवरून चालत आहोत अशी शंका आली. मंदिराचे स्तंभ , त्यावरील आणि भिंतीवरील कोरीव काम स्तुत्य आहे. गणेशाची मूर्ती, त्यासमोरील शिवपिंड अंधारात आहेत. मंदिराच्या बाहेरील बाजूस काहींनी आपली नावे लिहिली असल्याने ती बाहेरून खराब दिसते. मंदिरात अंधार असल्याने ते आतून मात्र स्वच्छ आहे.















पुन्हा तलावाच्या शेजारून दरवाजासमोरील रस्त्यावर आलो. ज्या रस्त्याने आलो त्याला समांतर वाटेवर झाडांची कमानी असलेली दुसरी ( कदाचित फसवी) वाट आहे. इथपर्यंत येवूनही खिंडीपर्यंत जाण्याचा रस्ता दिसेना. दोन वाटा जिथे एकमेकांचा निरोप घेतात तिथे मुल्हेरगडाकडे जाणारी वाट दाखवणारा फलक दिसला. आम्ही डावीकडची मुल्हेरच्या दिशेने जाणारी वाट निवडली. उजवीकडची वाट उंचावर किंवा हरगडच्या दिशेने जाणारी वाटली नाही.

पायपीट केल्यानंतर मुल्हेरच्या पायथ्याशी असलेल्या हत्ती टाका व मोती टाका अशी दोन पाण्याची टाकी असून मोती टाक्यातील पाणी स्वच्छ आणि गोड आहे. आतील मोठमोठ्या शिळांमुळे टाक्यांची खोली कळते. दोन्ही टाक्यांच्या मधोमध जाणारी वाट जास्त चढावाची दिसल्याने आम्ही ती निवडली नाही. टाके डाव्या हाताला ठेवत पुढे चढण दिसेल अशी वाट शोधत चढू लागलो. पण काही केल्या खिंडीकडे जाणारा रस्ता दिसत नव्हता, शिवाय इतक्या उंचीवरही आलो होतो की आता उतार शोधण्याची वेळ आली. एका वळणावर पोहोचल्यानंतर अगदी थोड्याच अंतरावर खाली उतरण्यासाठी पायऱ्या दिसल्या. सोपं आहे म्हणता म्हणता कसरत करत खिंडीत उतरलो.



आता कुठे प्रत्यक्ष हरगडसाठी पायपीट सुरु झाली. गडावर जाणारी वाट स्पष्ट नाही. खाली दिसलेल्या धनगराला विचारून खात्री करून घेतली. कसेही करून उंचावर दिसणाऱ्या शिळांपर्यंत पोहोचायचे ठरवले आणि दिसेल त्या मार्गाने चालत राहिलो. आश्चर्य म्हणजे झाडाझुडूपांतून चालताना हुबेहूब घुंगरूप्रमाणे आवाज येत होता. त्या वनस्पतीचे नाव नाही माहीत.



शिळांच्या वर थोड्या सपाटीवर आल्यानंतरही हरगडचा माथा बराच उंचावर होता. खिंडीपासून शिळांपर्यंत जितके चढून गेलो पुन्हा तितकेच त्या उंचीवर विरुद्ध दिशेला म्हणजे मुल्हेरच्या दिशेने चालत यावे लागले. खिंडीतून जी किनार दिसली होती त्यावरून वेगाने उंची गाठू लागलो.









हरगड चढताना काही विशेष पहायला मिळेल असे  वाचण्यातही आले नव्हते. पण पुढे सरसगडला असलेल्या पायऱ्यांप्रमाणे रचना दिसली. पण तुलनेने रुंदी कमी, त्यामुळे कठीण आणि उंची कमी, त्यामुळे चढण्यास सोप्या होत्या. पायाला टोचणारी पण शरीरात न रूतणारी झुडुपे पार करावी लागतात. त्यानंतर एक अनपेक्षित अप्रतिम सुंदर दरवाजा दिसतो. तो चढणे आव्हानात्मक आहे.





दरवाजाखालील भिंतीला टेकून रचलेल्या लगोरीवर चढलो. समोर आणि उजव्या बाजूला खाचा शोधून दरवाजाबाजूच्या भिंतीला मिठी मारत अगदी दहा-पंधरा सेमी जागेवर दोन्ही पायांचे तळवे सांभाळून सरकवले. एका हाताने चाचपडत दाराची आतील किनार जाणवली आणि सुखरूपपणे आत शिरलो. अनेक पायऱ्या चढून जाताना पुन्हा सरळ रेषेत भक्कम दरवाजातून शिरताना डाव्या बाजूला शिलालेख दिसतो.





पठारावर येताच एक अस्वच्छ पाण्याचे टाके दिसते. उजवीकडील ‘हजारबागदी’ नावाची प्रचंड तोफ हेदेखील गडाचे वैशिष्ट्य आहे. ती (तेंव्हाच्या काळातल्या मावळ्यांनी) उचलण्यासाठी आणि फिरवण्यासाठी तोफेला कडा आहेत. वजनदार असल्याने ती कदाचित गडावरच आहे. गड-किल्ले, इतिहास आणि संबंधित व्यक्तींविषयीच्या वस्तू गडावरच राहू दिल्यास गडावर येणाऱ्यांची संख्या वाढेल असे मला वाटते.





दूरवर पठारावर एक पडके मंदीर आहे. वाटेत वाड्याचे अनेक अवशेष दिसतात. मित्रांना या गडावर येणारी दुसरी वाट दिसली. त्यासाठी हरगड आणि मुल्हेर यातील खिंड ओलांडून पलीकडून दिसणारी वाट धरावी जी आधी पडक्या मंदिराकडे येईल. झालं असं की गडावर येताना वाटेत सामान ठेवलं त्यामुळे ही वाट तपासून पाहता आली नाही.





पाऊल पुढे किंवा खाली घसरवून उतरण्यास मऊ माती मदत (?) करते. मागे फिरताना हरगडपासून खिंडीकडे जाणारी चढण्यासाठी सोपी व कमी अंतराची वाटही दिसली. आलेल्या मार्गाने पुन्हा मुल्हेरच्या दिशेने मार्गक्रमण सुरू झाले. काही वेळाने मुल्हेरचा नवखा मार्ग सुरू झाला. दुरूनच मुल्हेरचे वैशिष्टय दिसू लागले.



डोंगराच्या वलयीचा अत्यंत हुशारीने वापर केलेला दिसतो. उजवीकडे डोंगरावर हनुमानाची मूर्ती कोरलेली दिसते. आधी त्या दिशेने जावे लागते. वलयदार वाट एकामागून एक उंच भिंतींमागे लपवलेली आहे. कधी डावीकडून तर कधी उजवीकडून डोंगरापासून सुरू झालेल्या दोन भिंतींमध्ये फारच रुंद आणि कमी उंचीच्या पायऱ्या आहेत. उंच आणि कठीण पायऱ्या जशा दमछाक करण्यासाठी असतात तशाच ह्या सोप्या वळणावरच्या पायऱ्या मुद्दामच शत्रूचा वेळ वाया जावा किंवा अडथळे यावेत म्हणून असाव्यात असे वाटले. पायऱ्या चढून जाताना वेगवेगळ्या दिशेने दरवाजे दिसतात. तसेच वाटेत डावीकडे एक खराब पाण्याचे टाके आणि उजवीकडे मोठी गुहा आहे.














तंबू रोवण्यासाठी बालेकिल्ल्यावर जागा शोधताना बालेकिल्ला फिरून झाला. मावळतीच्या सूर्याचे वाळलेल्या गवतांवर पडणाऱ्या किरणांमुळे आकाशातल्या सूर्याच्या छटा गवताच्या प्रत्येक पात्यावर दिसू लागल्या. डावीकडे वळून पाहिल्यावर पाण्याचे खूप मोठे टाके असून त्यात मधोमध खांब आहे. त्यापुढे रेषेत पाण्याची अनेक मोठी टाकी आहेत.

प्रत्येक टाक्यातील वरचा गाळ वाऱ्यामुळे एका बाजूला गेल्याने दुसऱ्या भागातील पाणी संशयास्पद दिसते. थोड्या उंच टेकडीवर वाड्याचे व मंदिराचे अवशेष आहेत. तसेच एक अत्यंत घाणेरडे टाकेही आहे. या टाक्यामुळे आधी पाहिलेले पाणी स्वच्छ आणि पिण्यायोग्य आहे हा पर्याय उरला. उंचीमुळे थंडी आणि अंधारामुळे चांदण्यांशी मैत्री झाली. ती रात्र वैऱ्याची नाही वाऱ्याची होती. थंडगार रात्र वाऱ्यासह वेगाने वाहून गेली आणि जाताना सोबतचा थकवा घेवून गेली.





प्रत्येक गडावरची पहाट किती वेगळी असते !!

पहाटे जमीन आणि धुके तसेच धुके आणि आकाश यांमध्ये क्षितीज असल्याचे स्पष्ट दिसू लागले. एका सरळ रेषेत ३६० अंश कोनात सर्व बाजूने धुके असल्याचा निसर्गाचा चमत्कार अनुभवास आला. पेन्सिलच्या टोकाएवढे समोरील सर्व पर्वतांचे शिखर धुक्याच्या रेषेवर दिसत होते. टाक्यातील ज्या बाजूने पाणी घेतले तिथे वाऱ्यामुळे दिशा बदलल्याने हिरवा तवंग जमा झाला होता. असे असले तरीही पाणी पिण्यास योग्य होते. ( दुसरा पर्यायही नव्हता.)





मोरागडाकडे जाण्याची वाट धरली. त्यासाठी टेकडीला टाक्यांच्या उजव्या बाजूने वळसा घालून चालू लागलो. मोरागडचा दरवाजा हरगडच्या पायथ्यापासून दिसत होता. हरगडचे दरवाजे किती लपून ठेवले आहेत. बहुधा सर्व गडांचे दार लपवलेले असते; पण मोरागडचा दरवाजा मात्र स्पष्ट दिसतो; पण जितक्या सहजतेने नजर जाते तितक्या सहजतेने पोहोचता मात्र येत नाही.



मोरागडसाठी त्याच्या दिशेने मुल्हेरच्या किनाऱ्यावर येऊन छोटी-छोटी आव्हाने न्याहाळली. तटबंदीला असलेल्या दरवाजापर्यंत येण्यासाठी मोठ्या खड्ड्यात मोठमोठ्या ओबडधोबड शिळांवर योग्य जागी पाय ठेवत दरवाजापाशी आलो. मुल्हेर-मोरागडमधील खिंडीत उतरण्यासाठी मुल्हेरच्या दगडात खोदलेल्या पायऱ्या उतरून यावे लागते. उतरल्यावर डाव्या बाजूला पाण्याचे टाके असून त्यापुढे दोन्ही गडांना जोडणारी तटबंदी एका बाजूला म्हणजे मुल्हेरगावाच्या दिशेने असून दुसऱ्या बाजूला दरी आहे.





डावीकडे तटबंदीवरून चालताना मुल्हेरच्या पायथ्याशी असलेले सोमेश्वर मंदीर आणि दूरवर जुन्या वाड्यांचे  अवशेषही दिसले. तटबंदीच्या टोकाला दरवाजा असून त्याचा काहीसा भाग बुजलेला नाही व त्यामुळे तो किमान ओळखता तरी येतो. त्यापुढे काही पायऱ्या आहेत. मोरागडसाठी कातळात कोरलेल्या पायऱ्या चढण्याआधी सुरुवातीला हातांवर जोर देत चढल्यानंतर पायऱ्यांवरून हाच मार्ग आधी मुल्हेर उतरताना पाहिलेल्या मार्गासारखा दिसतो.

असमान उंच पायऱ्या चढताना समोरच्या पायरीचा आधार घ्यावा किंवा जोर द्यावा लागतो. अशा वीस ते तीस पायऱ्या चढल्यानंतर आपण गणपती व हनुमानाचे शिल्प असलेल्या दरवाजापाशी येतो. त्यापुढे उजवीकडे पाण्याचे टाके लागते.





वळसा घालून तिथून पुन्हा डावीकडे मळलेल्या वाटेने पण दरीला दूर ठेवत पुन्हा दगडी पायऱ्या चढाव्या लागतात. आधीच्या कठीण पायऱ्या चढून आल्यानंतर या सोप्या वाटतात. मागे दरी आहे अशी भीती मनात आल्यास त्या कठीण वाटतीलही....आणि दुरून दिसलेल्या दरवाजात आपण प्रवेश करतो.

दरवाजातून मागे वळून पाहिल्यास तो दरवाजा नसून ती भिंतीवरची तसबीर वाटते. ज्यात मुल्हेर, हरगड आणि त्यामागे बदलणाऱ्या आकाशाचे दृश्य सतत बदलते. पठारावर प्रवेश केल्यावर सुरुवातीला डावीकडे तटबंदीसदृश एक भिंत दिसते.जिच्यावर सहज चढून निसर्गाला साद घालता येते.....दाद देता येते. पुढे अस्वच्छ पाण्याची अनेक टाकी दिसतात. डावीकडे अतिशय सुंदर असे पाण्याचे मोठे तळे असून त्यात उतरण्यासाठी पायऱ्या आहे. तळ्याच्या भिंतीवरील वृक्ष बिनधास्तपणे स्वतःचे रूप तळ्यात न्याहाळताना दिसतात.





मोरागडचा विस्तार फार मोठा नाही.खात्रीलायक स्वच्छ पाण्याचे तळे मात्र आहे. शिवाय पाण्याच्या आणखी काही बांधकाम केलेल्या टाक्या आहेत. उतरताना पुढील पायऱ्या आणि मुल्हेर व हरगड खालील हिरवी मऊमऊ (?) दरी दिसते. मोरागड पासून मुल्हेरला जाताना मुल्हेरच्या दरवाजाशी असलेल्या शिळांवर चढताना त्याला खाचा सापडत जातात. मुल्हेर उतरताना उताराशी समांतर वाट मिळते. जी आधी टाळलेल्या हत्ती टाके व मोती टाक्यांमधील वाटेला जावून मिळते. त्यामुळे चढताना या दोन्ही टाक्यांच्या मधून जाणाऱ्या वाटेला 'वन–वे' समजू नये.



उतरल्यानंतर इथून पुन्हा मोरागडच्या दिशेने वाट धरली. कमी उंचीच्या झाडांच्या फांद्या आणि काटे, शर्टमध्ये अडकून अडथळा आणू लागल्या. कष्ट पडत आहेत म्हणजे काहीतरी खास पहायला मिळणार हेही नक्की होता. अगदी बेडकाप्रमाणे वाकून पुढे गेल्यावर समोरचे झाडी संपून समोर सोमेश्वर मंदिर दिसते.



मंदिराच्या बाहेर सुबक गणेश मूर्तीसमोर शिवपिंडीच्या आकाराचा खड्डा किंवा ठसा असून त्याच्या ठशाच्या खोलीएवढे शिवलिंग त्यात आहे. मुल्हेरचे सुरुवातीचे तीन दरवाजे ओलांडल्यानंतर तळ्याशेजारी दिसलेल्या गणेश मंदिराशी सोमेश्वर मंदीर काहीसे मिळते जुळते आहे. फक्त मंदिरात प्रवेश करूनही गाभाऱ्यात जाण्यासाठी मार्ग शोधावा लागतो. प्रकाशाची सोय करूनच अंधारातून जास्तीत जास्त एक व्यक्ती एका वेळी पायऱ्या उतरून वळून गाभाऱ्यात येऊ शकते. बाहेर असलेल्या नंदिसमोरील छोट्याशा चौकोनी खिडकीतून येणाऱ्या प्रकाशात आतील शिवपिंड दिसते. त्याभोवती शेषनाग धातूचा आहे. गाभाऱ्यात आत सात ते आठ जण बसू शकतात.



मंदिरासमोरील मोकळ्या जागेत पलीकडे हनुमानाची मूर्ती असून त्यापुढे पाण्याचे एक तळेही बांधलेले आहे. त्याला प्रवेशासाठी आत पायऱ्या आहेत. तळ्याकडे पाहून डावीकडे मुल्हेर व मोरागड यांमधील तटबंदी भिंतीसारखी दिसते. शिवाय मुल्हेरपासून मोरागड जाणारा रस्ता लक्षात येत नाही.

डिसेंबर महिन्यातल्या या ‘ट्रेकिंगिरी’त हरगड, मुल्हेर, मोरागड पाहताना एक गोष्ट लक्षात आली की येथील झाडांची उंची फार नाही. घनदाट जंगलही नाही. काटेरी झाडे मात्र अनेक आहेत. फुलांची संख्या इतर गडांच्या मानाने कमीच दिसली.त्यामुळे फुलपाखरे, भुंगे, पक्षी, पक्ष्यांचा आवाज ही या प्रवासातली कमतरता होती. काही माकडे होती खरी. (आम्हाला पाहून) त्यांची जागा घेणारे कोणी आले असे समजून ते नंतर दिसले नाहीत. सोमेश्वर मंदिरापासून मुल्हेर गावाकडे परतताना वाटेत सिमेंटच्या नव्या झोपड्या विश्रांतीसाठी बांधत असल्याचे पहिले. वर्षातून एकदा किंवा काही मोजक्या दिवशी होणाऱ्या भाविकांसाठी ही सोय होती. डागाळलेले, नाही गडाळलेले सामान आणि कपडे घेऊन तिन्ही गडांचा निरोप घेतला.

मुल्हेरगड ते मुल्हेरगावापर्यंत एका सुमोने येता येता समोरच बस जाताना दिसली आणि घाईघाईने उतरलो. ती बस भलत्याच ठिकाणी जाणार होती. काही वेळ रेंगाळण्यात गेला. पुन्हा एका सुमोने साल्हेर गावासाठी प्रवास सुरू झाला. गाडी शरीराला गडाकडे आणि हातातला कागद मनाला इतिहासात घेऊन गेला......

शिवरायांनी १६७१ मध्ये बागलाण मोहीम काढली आणि साल्हेर जिंकून घेतला. त्या मोहिमेची वार्ता दिल्लीच्या पातशाहाला मिळाली. ते ऐकून पातशहा कष्टी झाला, नि म्हणाला, ‘काय इलाज करावा, लाख लाख घोड्याचे सुभे रवाना केले ते बुडवले नामोहरम होऊन आले. आता कोण पाठवावे’ तेंव्हा पातशाहाने ‘ शिवाजी जोवर जिवंत तोवर दिल्ली आपण सोडत नाही ‘ असा विचार केला आणि इखलासखान व बहोलोलखान यांस बोलावून वीस हजार स्वारांनिशी सालेरीस रवाना केले. मग इखलासखानाने येऊन साल्हेरला वेढा घातला.

हे वर्तमान जेंव्हा राजांना कळले तेंव्हा मोगलाईत पाठवलेले आपले सरनौबत प्रतापरावांना जासूदाकरवी कळविले ‘तुम्ही लष्कर घेऊन सालेरीस जाऊन बेहलोलखानास धारून चालविणे आण कोकणातून पेशाव्यांनाही हशामानिशी रवाना केले. ‘हे इकडून येतील तुम्हीही वरघाटी कोकणातून येणे असे दुतर्फा चालून येऊन गनिमास गर्दीस मिळवणे’ अशी पत्रे पाठविली.

त्याप्रमाणे एकीकडून प्रतापराव तर दुसरीकडून पेशवे, उभयता सालेरीस आले आणि मोठे युद्ध झाले. सभासद बखरीत याचा उल्लेख खालीलप्रमाणे आढळतो :

‘चार प्रहर दिवस युद्ध जाहले. मोगल, पठाण, रजपूत, तोफांचे, हत्ती, उंट आराबा घालून युद्ध जाहले. युद्ध होताच पृथ्वीचा धुरळा असा उडाला की, तीन कोस औरस चौरस, आपले व परके लोक माणूस दिसत नव्हते. हत्ती रणास आले. दुतर्फा १० हजार माणूस मुर्दा जाहले पूर वाहिले. रक्ताचे चिखल जाहले. त्यामध्ये रुतो लाबले, असा कर्दम जाहला. मराठ्यांनी इखालासखान आणि बेहलोलखानाचा पाडाव केला. युद्धात प्रचंड हानी झाली. या युद्धात शिवरायांच्या एक १ लाख २० हजार सैन्याचा समावेश होता, पैकी १० हजार माणसे कामास आले. सहा हजार घोडे, सहा हजार उंट, सव्वाशे हत्ती तसेच खजिना, जडजवाहीर, कापड अशी अफाट मालमत्ता शिवरायांच्या हाती आली. या युद्धात मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ केली. मोरोपंत पेशवे आणि आणि प्रतापराव सरनौबत यांनी आणीबाणी केली. सूर्यराव काकडे यांना पराक्रम गाजवताना आपला देह ठेवावा लागला. ते तोफेचा गोळा लागून पडले. ‘सूर्यराव काही सामान्य योद्धा नव्हे. भारती जैसा कर्ण योद्धा त्याचा प्रतिमेचा असा शूर पडला.’

विजयाची बातमी शिवरायांकडे गेली. राजे खूप खूष झाले. खबर घेऊन आलेल्या जासूदांना सोन्याची कडी आणि प्रतापराव सरनौबत, मोरोपंत पेशवे, आनंदराव, व्यंकोजीपंत यांना अपार बक्षीस आणि द्रव्य देण्यात आले. हा पराभव दिल्लीच्या बादशहाच्या जिव्हारी लागला की सभासद म्हणतो- पातशहा असे कष्टी झाले. ‘खुदाने मुसलमानांची पातशाही दूर करून शिवाजीसच दिधली असे वाटते. आता शिवाजी अगोदर आपणास मृत्यू येईल तर बरे. आता शिवाजीची चिंता सोसवत नाही.’ असे बोलिले. मोगलांच्या सैन्याशी समोरासमोर लढाई करून तोपर्यंत महाराजांना विजय प्राप्त झाला होता, त्यात साल्हेरचा विजय प्रथम मानावर होता. असा मोठा विजय यापूर्वी कधीही मिळाला नव्हता. या युद्धात महाराजांच्या लोकांनी दाखवलेल्या युद्धकौशल्याची व शौर्याची कीर्ती चहूकडे पसरली आणि त्यांचा दरारा अधिकच वाढला. साल्हेर जिंकल्यावर त्यासमोरील मुल्हेर किल्ला मराठ्यांनी जिंकला आणि संपूर्ण बागलाण प्रांतावर त्यांनी शह बसवला. त्यामुळे सुरत शहरात कायमची दहशत बसली.







प्रवासात काहीच दिसले नाही. अगदी स्वप्नसुद्धा नाही. इतकी गाढ झोप लागली होती.

साल्हेर म्हणजे महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे शिखर. पहिल्या दर्शनात तो केवळ डोंगर भासेल.किल्ले, ट्रेकिंग वगैरे माहित नसेल तर रस्त्यावरून म्हणजे किमान साल्हेरवाडीतून किल्ला असल्याची काहीच चिन्हे दिसत नाहीत. पावसाळ्यात तर शिखरावरचे मंदिरही दिसत नाही; परंतु पावसाळ्यात फक्त बसमधून पायथ्याशी पोहोचण्याचा प्रवासही आनंद देऊन जातो.

शिखरावर जाण्याआधी शेतातून जाणारी वाट खात्री करून घेतली. संध्याकाळच्या वेळी याच मार्गाने काही ट्रेकर्स उतरतही होते. वाट अगदीच स्पष्ट असल्याने रस्ता चुकण्याचा प्रश्न नव्हता. थोड्या उंचीवरून उजवीकडे खाली एका मंदिराचा कळस दिसला. ते मंदीर आहे की घर या तर्काला विराम मिळाला.



आधारासाठी कधी स्वतःचा गुडघा तर कधी तसाच कडक दगड. उतार तीव्र नसला तरी अंतिम लक्ष्य गाठण्यासाठी पायवाटेकडे लक्ष द्यायचे आहे हे लक्षात ठेवून होतो. उजवीकडे उंचावर पांढरेशुभ्र मंदीर असताना आमची वाटचाल मात्र डावीकडे होत होती. खडकांच्या पायर्‍या सुरू झाल्या आणि विशिष्ट उंचीही गाठत गेलो. पावसाळ्यातल्या पाण्याच्या अनेक वाटा सहज ओळखू येत होत्या. डोंगराच्या एकाच बाजूला असणार्‍या वळणांमुळे काही नवीन पहायला मिळत नव्हते.



पायवाटेची चढण संपली की समोर डावीकडे तटबंदी त्याला बिलगून असलेले टाके आणि पलीकडे प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला बुरुजाला बाहेरून दगड रचलेले दिसतात तर उजवीकडचा बुरूज थोड्या उंचीवर आहे. अगदी थोड्या अंतरावर दगडी विटांनी बांधलेला दरवाजा असून त्यासमोर पाण्याचे मोठे कोरडे टाके आहे. आत प्रवेश केल्यानंतर समोरील छोट्या भिंतीला वळसा घालून तिसर्‍या दरवाजात प्रवेश करावा लागतो. दरवाजावरील सुंदर नक्षीकाम टिकून आहे. दगडातली आडवी नक्षी एखाद्या तोरणाप्रमाणे दिसते.

पुढे काहीशा सपाट पायवाटेवरून जाताना पुन्हा दगडी पायर्‍यांमुळे आपण वेगाने उंची गाठतो. साल्हेरच्या कड्याला चिकटून असलेल्या पायर्‍या चढताना डावीकडे मात्र दरीमुळे आपणही कड्याला स्पर्श करून चालू शकतो. समोर पाहत चालत राहिल्यास अचानक समोर साल्हेरची किनार लागते आणि आपली दिशा बदलून दरवजापर्यंत डोंगराच्या कडेत कोरलेल्या तीव्र चढावाच्या पायर्‍या चढाव्या लागतात.



या पायऱ्या चढताना मागे तोल तर जात नाही ना या भीतीने समोरच्या पायरीवर अतिरिक्त वाकावे लागते आणि खांद्यावरचे ओझे पूर्णपणे पाठीवर येते. पंचवीस ते तीस पायऱ्या चढून विसावल्यावर उतरायचे कसे हा विचार वेगाने गुडघ्यातून डोक्यापर्यंत पोहोचतो. दरवाजा पार केल्यानंतर पुन्हा दिशा बदलून पुन्हा डोंगराच्या कडेवर अगदी तसेच आव्हान समोर उभे राहते. या दोन दरवाजांमुळे खरोखरच किल्ला चढून गेल्याचे समाधान मिळते. त्यापुढील दरवाजापर्यंत जाणे अगदी सोपे असून हा दरवाजा फक्त किल्ल्यावर प्रवेश करण्याची वेळ आल्याची खूण आहे.

गडावर सर्वत्र झुडुपे पसरली आहेत. तेथून अजून किती पुढे आणि उंचावर मार्गक्रमण करायचे आहे ते लक्षात येत नाही. पाण्याचे काही ओहोळ ओलांडून तिरकस दिशेने टोकावर दिसणाऱ्या मंदिराच्या दिशेने चालत रहावे. सपाट जागेवरच वाटेत एक स्वच्छ पाण्याचे टाके लागते. पाणी अतिशय थंड व गोड आहे. अगदी पुढे यज्ञकुंड आहे.





पुन्हा उंचावरील मंदिराच्या दिशेने चालत राहिल्यास ओबडधोबड दगडांवरून वाटचाल करताना स्वच्छ पाण्याची छोटी मोठी डबकी दिसतात. पुढे वाटेत तीन गुहा लागतात. राहण्यासाठी ही उत्तम सोय आहे. डावीकडून पहिल्या गुहेतील खांबावर सुरेख नक्षी कोरलेली आहे. गुहेसमोरील जागेत काही अवशेष आहेत.





कालही सूर्य महाराष्ट्रात उगवला आणि गुजरातमध्ये मावळला. किती विचित्र आहे आहे ना हे ? सूर्य स्थिर आहे आणि पृथ्वी त्याभोवती फिरते हे माहीत असूनही सूर्य उगवला, वर आला, मावळला असं म्हणणं म्हणजे शास्त्रज्ञ, विज्ञान, सूर्य आणि सत्य यांचा नकळत अपमान तर होत नाही ना ? गुहा, अंधार, तारे, चांदण्या, थंडी या मित्रांसोबत देखणा काळोख गडांवर अनुभवास येतो. (मी तुटणारे तारे पाहिले. गड किल्ल्यांना दीर्घायुष्य मिळो)

झोपेतून जागे झालो तर पहाट जागी होत होती. गुहेपासून काही अंतरावर एक वाट शिखरावर जाण्यासाठी खुणावते. वळणावर मोठ्या दगडापासून एक वाट थेट वर जाते तर दुसरी वाट सरळ सालोटाच्या दिशेने जाते. वाट डोंगराच्या उताराला छेदणारी असून शरीराला पृष्ठभाग तिरका आणि निसरडा आहे. जसजसे पुढे जावे तसतशी वाट मिळत जाते. काही खडकाळ पायऱ्याही दिसतात. सालोटा दिसेल अशा साल्हेरच्या कड्यावरून मंदिराकडे जाणारी वाट दिसते. काही क्षणातच आपण महाराष्ट्रातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या शिखरावर पोहोचतो.



परशुरामांचे मंदीर शिखरावर असूनही अगदी भक्कम व सुंदर आहे. शिखरावरून सालोटावर कसे पोहोचायचे याची उत्तरे मिळत नाहीत. सकाळी साल्हेरची सावली दूरवर पिरामिडप्रमाणे दिसतात. मंदिरामागे इथे येण्याचा सोपा मार्ग दिसतो. मंदिरामागून सोप्या वाटेने उतरताना स्वतः निवडलेली वाट वेळ वाया घालवणारी होती हे कळले.





गुहेसमोर काही अंतरावर गंगासागर हा मोठा तलाव आहे. मुल्हेरच्या पायथ्याशी असलेले गणेश मंदीर आणि माथ्यावर पाहिलेल्या खांबाप्रमाणे इथेही मधोमध खांब आहे. पाणी अस्वच्छ असले तरी तलावाकाठचे प्रतिबिंब आणि आतील स्तंभाचे प्रतिबिंब यामुळे तलावाची खोली समजत नाही. पांढरा सूर्य साल्हेरमागून मंदिराजवळून उगवताना चमत्कार भासतो. दरीच्या काठोकाठ असलेल्या तलावाच्या अलीकडे रेणुकामातेचे मंदीर आहे. गडाच्या पठारावरून या मंदिरात जाण्यासाठी काही पायऱ्या उतराव्या लागतात. पुढे पूर्वेकडे चालत राहिल्यास उजवीकडे राजवाड्याचे अवशेष आणि तेथे जाण्यासाठी पायऱ्या दिसतात.



त्या काळी हे दृश्य किती श्रीमंत असेल याची कल्पना या वाड्याकडे पाहून करता येते.



गडाच्या पूर्वेकडील दरवाजापर्यंत उतरण्यासाठी दगडी पायऱ्या उतरून बाहेर यावे लागते. समोरच एक बुरूज असून त्याला कट्टा नाही. उजवीकडे कातळात अनेक गुहा आणि अस्वच्छ पाण्याच्या टाक्या आहेत. त्या कोरड्या असल्याने बऱ्याच खोल आणि विभाग केलेल्या दिसतात. त्या समोरील वाटेने चालताना वाटेच्या डावीकडे मात्र दरीला सांभाळत समोर चालावे लागते. तटबंदीचा तुटलेला काही भाग आणि त्यापुढे दरवाजा लागतो. दरवाजाच्या उजव्या बाजूला सुद्धा वाट असून ती वाट साल्हेरच्या कड्याला लांबपर्यंत वळसा घालते.











दरवाजातून उतरल्यावर साल्हेरच्या या पूर्वेकडील कडेला कोरलेल्या उंच पायऱ्या उतरताना जरा जपून.... कातळकड्याच्या या धारेवर कोरलेल्या या पायऱ्या आजही किती मजबूत आहेत. एकेका पायरीवर दोन्ही पाय ठेवल्यानंतरच पुढील पायरीवर उतरणे सोयीचे ठरते.

अशा पन्नास ते साठ पायऱ्या उतल्यानंतर लगेचच खिंडीत जाता येईल असे वाटत असतानाच उजवीकडे एक दरवाजा दिसतो. त्यातून बाहेर आल्यावर सालोटा गाठण्यासाठी आधी विरूद्ध दिशेला लांबवर उतरत जावे लागते. त्यानंतर पुन्हा सरळ रस्ता खिंडीच्या दिशेने जातो. मध्येच एका मार्गावर डोंगराच्या काही भागात अजिबात खाचा नसल्याने शरीराचा योग्य कोन राखत तो छोटासा टप्पा पार पाडावा लागतो आणि काही वेळातच वेगाने उतरत आपण साल्हेर ते सालोटा यामधील खिंडीत उतरतो.









खिंडीच्या ज्या बाजूला (पूर्व दिशेला) जितके अंतर आधी साल्हेरच्या उतारावर सालोटासाठी विरुद्ध दिशेने चालत उतरावे लागते. तितकेच अंतर  सालोटाच्या उतारावर खिंडीच्या त्याच बाजूला (पूर्व बाजूलाच) चालावे लागते. त्याच डोंगरावर सर्पाकृती वळणावरून चालताना लगतची वळणे फारच चिकटून असून चढण आणि घसरणीची आहेत. थोड्या उंचीनंतर वाट गर्द झाडीतून जाते. आपल्या खूप पुढे असलेल्या व्यक्ती नेमका कुठून गेला हे कळत नाही.

वर कातळकड्यात गडद काळी तिरकी रेघ दिसते. तिथेच पायऱ्या आहेत हे तिथे जाऊन पोहोचल्यावर कळते. या पायऱ्या जरा जास्तच तीव्र चढावाच्या आहेत; म्हटल्यास ती फक्त उंची गाठून देणारी शिडीच असावी. या पायऱ्या चढताना हरगड आणि साल्हेरच्या पायऱ्या सोप्या आणि सरावासाठी होत्या असे वाटले.







हरगड, मोरागड आणि साल्हेरच्या पायऱ्या सावलीत तरी होत्या; पण सालोटाच्या दगडी पायऱ्या चढताना वरच्या पायरीचा पृष्ठभाग गरमागरम आणि हाताला टोचणारा होता. यातील काही पायऱ्यांना तडे गेले आहेत. दुर्लक्ष झाल्यास भविष्यात सालोटा चढून जाणे कठीण होऊन जाईल. त्यापुढे...नाही त्यावर तुलनेने काही सोप्या पायऱ्या चढून गेल्यावर दरवाजासमोर अडथळे म्हणून मोठमोठ्या शिळा पडलेल्या आहेत. पुन्हा व्यवस्थित चालता येईल अशी वाट सुरू होते.





पुढील दरवाजा पार करून वर पहिल्यास दरवाजावर (कदाचित) सामान ठेवण्यासाठी जागा आहे. डोंगराला वळसा घालणाऱ्या आणि दरीला लागून असलेल्या वाटेवरून चालताना साल्हेरप्रमाणेच पाण्याच्या अनेक टाक्या आश्चर्य वाटेल अशाच आहेत. काचेसारखं नितळ आणि पारदर्शक पाण्याची एक टाकी सालोटा चढताना आलेला थकवा दूर पळवते आणि पुढच्या प्रवासासाठी तयारही करते. पुन्हा मागे फिरून एक वाट बालेकिल्ल्यावर जाते. वेगवेगळ्या दिशांना असलेले दरवाजे पार केल्यानंतर मधोमध शेवटची टेकडी सालोटाचे शिखर दिसू लागते.





टेकडीवर सर्वत्र काटेरी झुडुपे आहेत. टेकडीवर जाण्यासाठी तिला पूर्ण वळसा घालून चढावे लागते. नाहीतर काटेरी झुडूपांमधून वाट काढत वर जाणे अशक्य नाही. शक्य आहे असे म्हणून शक्यतो टाळले जाते. त्यापेक्षा  अशक्य नाही असे म्हणत स्वतःला आव्हान देणे योग्य. सालोटाच्या सर्वात उंच जागेवर येऊन साल्हेरच्या माथ्यावरील परशुरामाचे मंदीर घरातल्या देव्हाऱ्याप्रमाणे दिसते. डोंगराच्या कडेवर कातळात कोरलेल्या पायऱ्या कशा बनवल्या असतील असा प्रश्न पडतो....आश्चर्य वाटते. म्हणजे आधी सर्वात खालची पायरी बनवली की सर्वात वरची ? जर दोन्हीकडून सुरुवात केली असेल तर शेवटची पायरी कशी बनवली ? आणि सर्वात महत्वाचं म्हणजे इतकं मजबूत बांधकाम करताना निसर्गदेखील कसा टिकून राहिला ?









उतरताना पुन्हा काटेरी झुडुपे, पुन्हा ते दरवाजापाशी अडथळे, पुन्हा ते सुखावणारं निर्मळ पाणी. पुन्हा मनात प्रश्न आणणारी अनेक टाकी आणि रखरखीत उन्हात पुन्हा फक्त खोलवर दिसणाऱ्या भीतीदायक पायऱ्या. एकेका गुडघ्यावर पूर्ण शरीराचे वजन काही काळ पडत राहते. इतक्या एकाग्रतेने खोलीत एकट्याने कधी अभ्यास करणेही जमले नाही पण ते या उघड्या डोंगरावर सहज शक्य झाले. झाडाच्या एकेक पानामुळे तयार होणारी थोडी सावलीही त्वचेला आणि विशेषतः डोळ्यांना सुखावते.

लक्षात आलेली एक चूक (इथे येणाऱ्यांसाठी) सांगावीशी वाटते. उतरताना साल्हेरच्या ज्या बाजूने सालोटासाठी उतरावे लागते, त्याच ( पूर्व बाजूला) सालोटासाठी सुरुवात न करता ती सुरुवात पश्चिमेकडून करणे फार सोयीस्कर ठरेल. त्यानंतर एका  उंचीवर पूर्वेकडे यावे.





परतीच्या मार्गासाठी वाघांबे गावातून जाण्याचा मार्ग निवडला. सालोटाच्या डोंगराला जोडून एक लांबलचक सोंड गावात जाते. म्हणजे पश्चिमेला पर्वताच्या दुसरी किनार गाठली. त्या सोंडेपर्यंत जाणारी वाट वारंवार तपासून पाहू लागलो. एका जागेवर वाट संपली असे जाहीर वाटतानाच त्याच वेळी पुन्हा डोंगराच्या दिशेने जाणाऱ्या वळणावरून उतरून योग्य वाट नक्की सापडते.

सोंडेचा उतार तीव्र नाही पण आपण मुख्य रस्त्यापासून किती लांब आलो आहोत याचे उत्तर मिळत जाते. सालोटा सर केल्यानंतर बससाठी संध्याकाळी चार वाजण्याच्या आधी गावात पोहोचणे सोयीचे ठरते. तीन दिवस सांभाळलेले वजन पाठीवरून कमी होते; पण गुडघ्यांवर जाणवत राहते. मनातली पोकळ गुहेत गड-किल्ल्याच्या दृश्यांचे प्रदर्शन सुरूच राहते.

परीक्षा कठीण असली तरी आपण तिला सामोरे जातोच ना ? आणि दरवेळी किती कठीण होता पेपर असे म्हटलं होतं. नवीन आव्हानामुळे जुने पार केलेले आव्हान कसे लगेच विसरतो ना आपण ? आव्हान असो की समस्या सतत पुढे बघा, मागे वळून पाहू नका असं शिकवलंय ना आपल्याला. भूतकाळात रमू नका, भविष्याकडे नजर ठेवून काम करा असं सगळेच सांगतात. आपल्या देशात, राज्यात, समाजात रोज नवीन समस्या जन्माला येऊन मोठ्या होऊन आव्हानं बनतात. यामुळे दुर्ग-संवर्धनाच्या गरजेकडे दुर्लक्ष तर झालं किंवा होत नाही ना ??



महाराष्ट्र टाइम्स
संवाद

निसर्गाच्या सान्निध्यात माणसाला त्याचं खरं अस्तित्व कळतं. त्यात गिर्यारोहण आणि तेही हिमालयातील असेल तर, ज्याच्या-त्याच्या असीम सहनशक्तीची कसोटीच. कारण याचवेळी सृष्टीच्या या पसाऱ्यात आप किती टिकू शकतो, निभावू शकतो, याचा अंदाज येतो. पण हा अंदाज, अनुभव शहाणं करून सोडतो. काहीतरी भन्नाट पदरात टाकून जातो. असं काही भन्नाटपणच पंकज घारे या युवा लेखकाच्या 'पहिले पाऊल' या पुस्तकात वाचायला मिळतं. पुस्तकाचं नाव 'पहिले पाऊल', तसंच या लेखकाचं लेखनातीलही हे पहिलं पाऊल आहे. मात्र हे पहिलंच पाऊल दमदार आहे. केवळ लेखनाच्या अंगाने नाही, तर पुस्तकाच्या अंतर्बाह्य मांडणीच्या अंगानेही. उदाहरणार्थ पुस्तकाचं [illegible] तिकिटासारखं आहे, तर अनुक्रमणिका प्रवासफलकासारखी आहे. संपूर्ण पुस्तकाचीच निर्मितीच अशी कल्पकतेनं केली आहे. लेखकाने केलेली भटकंतीही अशीच खास आहे.

महाराष्ट्रातल्या गड-किल्ल्यांवर भटकणारा लेखक हिमालयाच्या प्रवासाची सुरुवात भांडूपमधल्या चाळीतल्या घरापासून करतो. भावनांची शिदोरी घेऊन मित्रांसोबत दिल्ली गाठतो. दिल्ली ते मनाली हा साधा प्रवाससुद्धा त्याने खूप रंजक केला आहे. पुस्तकाचा मुख्य भाग हा 'युथ हॉस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया' सोबत केलेल्या 'सर पास' या ट्रेकचा आहे. १३८०० फूट उंचीपर्यंतचा जवळपास ७० किमी प्रवास थक्क करणारा आहे. शरीराला होणारा त्रास, वाटेत भेटणारे स्थानिक, नव्या मित्रांशी होणारी ओळख, तंबुतील मैफील... यांचे लेखकाने केलेले वर्णन वाचताना आपण त्या ठिकाणी प्रत्यक्ष असल्याचा भास होतो. तिथल्या एकूणच वातावरणाचं वर्णन करताना लेखकाला वर्णनशैली छान साधली आहे. विशेषत: थंडी, ऊन, वारा, पाऊस, वादळ, पाणी, सूर्यप्रकाश आणि अंधारसुद्धा वर्णन करताना लेखकाने वापरलेली विशेषणे मराठी भाषेची समृद्धी दाखवतात.



याशिवाय स्वत:कडून झालेल्या चुका, सहकाऱ्यांशी होणारी निरपेक्ष देवाण-घेवाण, त्यासाठी होणारी वृक्षांची मदत, थकवा, वातावरणातील अचानक बदल, दिशाभूल, प्रवास रद्द झाल्यामुळे निराश होणे आणि पुन्हा त्वेषाने चढाई करणे आणि सर्व काही विसरायला लावणाऱ्या निसर्गाचं लेखकाने केलेलं वर्णन रोमहर्षक असंच आहे. हे पुस्तक निव्वळ वर्णनपर नाही, त्यात ओघाने प्रवाससंबंधीच्या काही सूचनाही येतात. उदाहरणार्थ प्रवासात सोबत बाळगलेल्या वस्तुंचं महत्त्व, गिर्यारोहण करताना, जंगलात फिरताना, हिमावरून चालताना घ्यावयाची काळजी यासंबंधीचं केलेलं मार्गदर्शन उपयुक्त आहे.

या पुस्तकातले काही प्रसंग तर मनात घर करतात. उंच शिखरावरून कॅमेरा दरीत पडणे, आईसोबत न बोलता केलेला संवाद, घरची आठवण येणे हे प्रसंग फारच भावनाप्रधान उतरले आहेत. लेखकाला असलेली जेवणाची आवड आणि मांसाहारी जेवणाचे वर्णन विशेष उल्लेखनीय आहे. 'जीव भांड्यात पडला', 'प्राण कंठाशी आला' आणि जिवात जीव आला' असं मांसाहार करतानाचं वर्णन लाजवाब आहे. हिमालय प्रवासानंतर अंधाऱ्या रात्री झालेल्या अपघाताचं वर्णन मन विषण्ण करतं. पण तरीही त्यानंतर अनियोजित दिल्ली, आग्रा व धर्मस्थळे पाहताना लेखकाने केलेली चौफेर टोलेबाजी वाचकाला हसवतेही.

एकूण प्रकरणांची नावं, कल्पनाशक्ती, विनोदबुद्धी, तत्त्वज्ञान सांगण्याचा केलेला प्रयत्न, शब्दांशी केलेला सुरेख खेळ, ज्ञानातून मनोरंजन, संस्कार आणि संवेदनशील मनातून आलेले विचार, ह्या या पुस्तकाच्या जमेच्या बाजू आहेत. रंगीत छायाचित्रांची मांडणीसुद्धा नावीन्यपूर्ण आहे. एखाद्याला पुस्तकाची अजिबात आवड नसेल तर, ती आवड या पुस्तकामुळे नक्की निर्माण होऊ शकते.

सामना
रविवार, ११ नोव्हेंबर २०१२

## पहिले पाऊल




संवेदना प्रकाशनातर्फे नेहमीच दर्जेदार आणि वेगळ्या लेखकांची पुस्तके प्रकाशित होतात. त्यापैकीच एक आहे : पहिले पाऊल! पंकज धारे या तरुण लेखकाच्या या पहिल्या पावलातच प्रवास मंथनाचे हे पुस्तक म्हणजे भूतकाळातून वेगाने येणाऱ्या स्मृती आणि काल्पनिक भविष्यात भटकणारे मन यासोबत करावयाच्या प्रवासाचे जगातले पहिले 'तिकीट' आहे!

हिमालय अजूनही आपल्याला खूपसा अज्ञात आहे. गिर्यारोहकांना सतत साद घालणारा इथला बर्फ आणि समाज विद्यार्थी म्हणून आणि तोही रसिक म्हणून वेगळा जाणवतो अशा काही कवी लेखकांना अनुभवांची अक्षरलेखणी लिहावीशी वाटतात. तेव्हा ती अविस्मरणीय होतात. आपल्याच देशातील माणसांची इथे पुन्हा नव्याने ओळख होते. अपघात, पायपीट, फोन, अश्रू, विमानप्रवास, घराची ओढ, आई-बाबांची आठवण, युथ फेस्टिवल, युथ होस्टेल, शिस्त, पाहुणचार अशा अनेक गोष्टी वाचताना आपणही समृद्ध होत जातो. एकोणीस प्रकरणात प्रवासाचा शीण अजिबात जाणवत नाही. हेच याचे वैशिष्ट्य!

पहिले पाऊल
लेखक- पंकज धारे
संवेदना प्रकाशन, पुणे - ३३
पृष्ठे : १४०, मूल्य : रु. १६०.

रविवार, २८ जुलै २०१३ लोकरंग ५

## हिमालयाचा पहिला अनुभव




हिमालयात पहिल्यांदा गेलेल्या युवकाने हिमालयात केलेल्या प्रवासाचे वर्णन यात आहे. त्यात भोवतालच्या निसर्गसौंदर्याच्या वर्णनासोबत प्रवासातील बारकावे, तिथली माणसं, तिथल्या चालीरीती, आलेले थरारक अनुभव लेखकाने कथन केले आहेत. यूथ हॉस्टेलच्या संगतीने केलेल्या या सफरीचे वर्णन वाचनीय आहे. सरपासच्या मार्गक्रमणेच्या एकेका टप्प्यात आलेल्या अनुभवांवर एकेक प्रकरण बेतले आहे. साध्यासोप्या शब्दांत आणि शैलीत आपल्या गिर्यारोहण मोहिमेचा सांगितलेला हा रिपोर्ताज आहे.

# सर पासची साहसवारी

लोकमत




गियरिरोहणाचा भरपूर अनुभव गाठीशी असलेल्यांना हिमालयीन शिखरे काबीज करणे नेहमीच आव्हानात्मक आणि महत्त्वाचे वाटते. अशीच महाराष्ट्रातील गड-किल्ल्यांवर स्वारी करत मग हिमालय खुणवू लागलेल्या लेखकाने त्याप्रमाणे साहस करत सर पास शिखर गाठण्याचे ठरवले. युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडियाबरोबर केलेला १३,८०० फुटांवरच्या सर पास शिखरापर्यंतचा एकूण प्रवास पंकज घारे यांनी 'पहिले पाऊल' पुस्तकातून मांडला आहे. या साहसवारीला जाताना घ्यावी लागणारी काळजी, वाटेतल्या गावात आलेले विविध रोमांचकारी अनुभव, शिखर काबीज करतानाचे क्षण अक्षरक्ष: जीवंत वाटतात. तसेच एवढा मोठा प्रवास करताना लागणाऱ्या धाडस, चिकाटी, सहनशीलता, सहकार्य असे गुण यातून शिकायला मिळतात. नवोदित साहसवीरांनाही पुस्तकातून प्रेरणा मिळू शकते.

**पहिले पाऊल - पंकज घारे, प्रकाशन - संवेदना प्रकाशन, मूल्य : १६०, पृष्ठे - १४०**

ट्रेकिंगिरी

ट्रेकिंगिरी



https://www.facebook.com/PahilePaool?ref=profile

# या किल्ल्यांचं करायचं काय?

- स्वराज्य स्थापना कशी करावी  याची गुरुकिल्ली आपल्याला महाराजांनी दिली. महाबलाढ्य लक्षावधी सुसज्ज आणि वेलट्रेंड सैनिकांच्या सेनेशी सर्वसामान्य लोकांनी कसे लढावे याच्या गुरुकिल्ल्या महाराजांनी जगाला दिल्या. गनिमी कावा, अर्थशास्त्र, न्यायसंस्था, पर्यावरण, शासनसंस्था, व्यापार आदी सर्व अंगांनी विचार करणारे छत्रपती शिवाजी महाराज. त्यांनी जशा या गुरुकिल्ल्यांची भॆंट आपल्यासाठी ठेवली तशीच तिनशॆहून अधिक बलदंड किल्ल्यांची, दुर्गांची भेट, वारसा त्यांनी आपल्यासाठी ठेवला. या दोन्ही किल्ल्यांचं, गुरुकिल्ल्यांचं आणि दुर्गांचं आपण जतन करणार की वाया घालवणार? त्यांच्या गैर-अवस्थे बद्दल अश्रू ढाळत रहाणार, दुर्लक्ष करणार की त्यांच्यासाठी  काही करणार?
- महाराष्ट्रात अनेक संस्था जमेल तसं , जमेल तितकं जीव तोडून काम करत आहेत. त्यांना आपली गरज आहे. आपण नक्की काही तरी करू शकतो.  घरी बसूनही. गृहीणीही. विद्यार्थीही. परदेशस्थ भारतीयही. ज्येष्ठ नागरिकही. ट्रेकर्स तर करतीलच. पण या वारशाचा अभिमान असणारा प्रत्येकजण. अगदी शाळकरी विद्यार्थ्यांपासून ते ज्येष्ठ नागरिक. गरीब किंवा श्रीमंत. प्रत्येकाने या जगन्नाथाच्या रथाला हातभार लावावा अशी अपेक्षा आहे.
- ई साहित्य प्रतिष्ठानच्या “आम्हीही किल्लेदार” या योजनेत सामिल व्हा. चला. आपल्या किल्ल्यांचं आणि वारशांचं जतन करूया.
- संपर्क : esahity@gmail.com
-